# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 27/09/2016 रोजी (का.प.क्र.06) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

मंगळवार दिनांक 27 सप्टेंबर 2016 रोजी (का.प.क्र.06) मा.सभापती श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11-15 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली.सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| 2. | स.स.श्री.नितीन रमन चित्ते |
| 3. | स.स.श्री.सिताराम इसराम सुरे |
| 4. | स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| 5. | स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे |
| 6. | स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| 7. | स.स.श्री.विकास प्रकाश एडके |
| 8. | स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| 9. | स.स.श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड |
| 10. | स.स.श्री.शेख समीना शेख इलियास |
| 11. | स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| 12. | स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| 13. | स.स.श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे |
| 14. | स.स.श्री.सोहेल शकील शेख |

**विषय क्र. 30 :** (दि.04/08/2016 च्या सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र.14)

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिका, सीआरटी, सी आय आय आणि बजाज यांच्या सामंजस्य कराराने एकूण सध्या 115 निवडणूक प्रभागांपैकी 36 निवडणूक प्रभागांमध्ये ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे गोळा करण्यात येऊन ओला कचरा वॉर्ड अंतर्गतच डंप करण्यात येऊन कंपोस्ट खत तयार करण्यात येत आहे. आणि सुका कचरा हा वेचकांमार्फत पुनर्प्रक्रिया करण्यासाठी जकात नाका येथे उभारण्यात आलेल्या सॉर्टिंग शेडला पाठविण्यात येतो. यामुळे नारेगांव ट्रेंचिंग ग्राऊंड येथे जाणाऱ्या कचऱ्याच्या वाहनांच्या फेऱ्या कमी झालेल्या आहेत. टप्प्याटप्प्याने ही योजना सर्व निवडणूक प्रभागांमध्ये राबविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक वॉर्डात सॉर्टिंगशेड आणि कंपोस्टींगकरीता संरक्षणासाठी वायर फेन्सींगची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत हिमायतबाग आणि सेंट्रल नाका या दोनच ठिकाणी सॉर्टिंग शेड उभारण्यात आलेले आहेत. मान्सुनकाळ असल्यामुळे लवकरात लवकर कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी प्रत्येक वॉर्डात खालीलप्रमाणे सॉर्टिंग शेड तयार करण्यासाठी जागा निश्चित होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | वॉर्डाचे नांव | सॉर्टिंग शेडची जागा |
|---|---|---|
| 01. | वॉर्ड कार्यालय अ | स्मृतीवन गार्डन |
| 02. | वॉर्ड कार्यालय ब | 1. सिपेट कंपनी मैदानाजवळ<br>2. मार्केट कमिटी जवळ (जाधववाडी)<br>3. मजनू हिल गार्डन |

| | | |
|---|---|---|
| 03. | वॉर्ड कार्यालय क | 1. मौलाना आझाद रिसर्च सेंटर<br>2. सेंट्रल नाका |
| 04. | वॉर्ड कार्यालय ड | 1. |
| 05. | वॉर्ड कार्यालय ई | 1. विठ्ठलनगर (जैन मंदिराच्या मागे) |
| 06. | वॉर्ड कार्यालय फ | 1. अग्निहोत्री चौकाच्या बाजूला (विश्वभारती कॉलनी) |
| 07. | सातारा-देवळाई परिसर | 2. एस.आर.पी. कॅम्प |

करिता, वॉर्डनिहाय सॉर्टिंग शेड उभारण्यासाठी उपरोक्त प्रमाणे जागांची निश्चिती करण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव सविनय सादर.

श्री.मकरंद कुलकर्णी : जागेची पाहणी करून निर्णय घ्यावा.

श्रीमती समीना शेख : वार्ड कार्यालय क साठी सेंन्ट्रल नाका येथे शेड उभारलेले आहे प्रस्तावात वार्ड कार्यालय क साठी मौलाना आझाद संशोधन केंद्राजवळ शेड उभारणे बाबत दिले तेथे शेड उभारणे चुकीचे आहे यातून ते वगळावे.

श्री.विकास एडके : ज्या जागा नमुद केलेल्या आहे त्या बाजूलाच धार्मीक स्थळे आहे हॉस्पीटल असतील तर दुसरीकडे शिप्ट करावे.

श्री.मकरंद कुलकर्णी : यात वार्ड अ कार्यालय साठीही स्मृतीवन गार्डन ची जागा असे म्हटले तेही वगळावे.

श्री.कैलास गायकवाड : प्रत्येक शेड साठी किती जागा लागणार आहे नागरीकाच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही याची दखल घेणे आवश्यक आहे.

मा.सभापती : या प्रस्तावा संदर्भात कार्यवाही करतांना स.सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार तेथे मस्जीद, मंदिर, उद्यान, हॉस्पीटल, शाळा असेल, अशा ठिकाणी नागरीकांची वर्दळ असते. नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही, आजुबाजुच्या नागरीकांना त्रास होणार नाही, यासाठी प्रशासनाने स्थळ पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी. कार्यवाहीचा अहवाल तसेच प्रत्येक शेडसाठी किती जागा लागणार आहे, यासह अहवाल समितीसमोर सादर करावा, प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिका, सीआरटी, सी आय आय आणि बजाज यांच्या सामंजस्य कराराने एकूण सध्या 115 निवडणूक प्रभागांपैकी 36 निवडणूक प्रभागांमध्ये ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे गोळा करण्यात येऊन ओला कचरा वॉर्ड अंतर्गतच डंप करण्यात येऊन कंपोस्ट खत तयार करण्यात येत असल्यामुळे आणि सुका कचरा हा वेचकांमार्फत पुनर्प्रक्रिया करण्यासाठी जकात नाका येथे उभारण्यात आलेल्या सॉर्टिंग शेडला पाठविण्यात येतो, यामुळे नारेगांव ट्रेंचिंग ग्राऊंड येथे जाणाऱ्या कचऱ्याच्या वाहनांच्या फेऱ्या कमी झालेल्या असल्याने टप्प्याटप्प्याने ही योजना सर्व निवडणूक प्रभागांमध्ये राबविण्यात येणार असून त्यासाठी प्रत्येक वॉर्डात सॉर्टिंगशेड आणि कंपोस्टींगकरीता संरक्षणासाठी वायर फेन्सींगची आवश्यकता असल्यामुळे व सद्यस्थितीत हिमायतबाग आणि सेंट्रल नाका या दोनच ठिकाणी सॉर्टिंग शेड उभारण्यात आलेले असल्याने लवकरात लवकर कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी वॉर्डनिहाय सॉर्टिंग शेड उभारण्यासाठी उपरोक्त अ.क्र.01 ते 07 प्रमाणे जागांची निश्चिती करण्यास मंजुरी देण्यांत येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या प्रस्तावा संदर्भात कार्यवाही करतांना स.सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार तेथे मस्जीद, मंदिर, उद्यान, हॉस्पीटल, शाळा असेल, अशा ठिकाणी नागरीकांची वर्दळ असते तसेच नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही व आजुबाजुच्या नागरीकांना त्रास होणार नाही,

यासाठी प्रशासनाने स्थळ पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी व कार्यवाहीचा अहवाल तसेच प्रत्येक शेडसाठी किती जागा लागणार आहे, यासह अहवाल स्थायी समितीसमोर सादर करावा, त्याप्रमाणे प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 31 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क मधील महानगरपालिकेच्या सर्व शाळेतील विविध दुरूस्त्या करणे करीता सन 2015-16 सा.बां. विभागाच्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.34,99,465/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समिती समोर सादर करणेस्तव शिफारस केली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2016-17 या आर्थिक वर्षा अंतर्गत इमारत देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यांत येईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक र.रू.34,99,465/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 31 ते 38 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क मधील महानगरपालिकेच्या सर्व शाळेतील विविध दुरूस्त्या करणे करीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.34,99,465/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 32 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, अतिक्रमण विभागासाठी साहित्य व डेब्रीज वाहतुक करण्यासाठी सद्यस्थितीत दोन ट्रक कार्यरत आहेत. अतिक्रमण कामाची व्याप्ती पाहता कार्यरत वाहने कमी पडत असल्यामुळे, अतिक्रमण विभागाकडून एक ट्रक व दोन टिप्पर वाहने खरेदी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

एक ट्रक व दोन टिप्पर वाहने खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रूपये 2976773/- रकमेचे आहे. सदरील खर्च नवीन वाहने खरेदी या लेखाशिर्षातून करण्यात येईल.

करीता अतिक्रमण विभागासाठी खरेदी करावयाच्या वाहनासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 29,76,773/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अतिक्रमण विभागासाठी साहित्य व डेब्रीज वाहतुकीसाठी एक ट्रक व दोन टिप्पर वाहने खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.2976773/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 33 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नारेगांव कचरा डेपो येथील कचरा हटविण्याच्या कामासाठी कार्यरत असलेले जेएस-200 एस्कॅवेटर मशिन जलयुक्त शिवार व शिवजल क्रांती योजनेच्या कामासाठी दिनांक 26/04/2016 पासून जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे परवानगीने जलसंपदा विभाग कार्यकारी अभियंता यांत्रिकी क्र.2 कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. अद्याप पर्यंत सदरील पोकलेन मशिन अप्राप्त आहे. नारेगांव कचरा डेपो येथील कचरा हटविण्याकरीता महानगरपालिकेकडे पर्यायी यंत्रणा नसल्यामुळे नविन एस्कॅवेटर-200 (पोकलेन) मशिन खरेदी करणे आहे. सदरील एस्कॅवेटर-200 (पोकलेन) मशिन नाले सफाई व अतिक्रमण इत्यादी कामासाठी आवश्यकतेनुसार वापरता येईल.

एस्कॅवेटर-200 (पोकलेन) मशिन खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रूपये 4935000/- रकमेचे आहे. सदरील खर्च हा 'नवीन वाहने खरेदी' या लेखाशिर्षातून करण्यात येईल. करीता एस्कॅवेटर-200

(पोकलेन) खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.49,35,000/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नारेगांव कचरा डेपो येथील कचरा हटविण्याच्या कामासाठी एस्कॅवेटर-200 (पोकलेन) मशिन खरेदी करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू. 49,35,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 34 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद जिल्हा नियोजन समिती मधुन वार्ड क्र.106 नक्षत्रवाडी गावांतील पश्चिमेकडील 1.50 कि.मी. रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रू.29,97,907/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचे जा.क्र.2016/नपाप्र/प्र.मा./नगरोत्थान/कावि/169 दि.10/02/2016 अन्वये अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता आदेश प्राप्त झाले आहे.

तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च जिल्हा वार्षिक योजनेतून मा.जिल्हाधिकारी यांचेकडून मंजूर प्रकल्पासाठी 50 टक्के इतकी रक्कम अनुदान स्वरूपात प्राप्त होणार असून उर्वरीत 50 टक्के रक्कम महानगरपालिकेस अर्थसंकल्पामधुन उपलब्ध करून द्यावयाची आहे. त्यानुसार दि.20/11/2015 च्या सर्वसाधारण सभेमधील विषय क्र.244 नुसार 50 टक्के रक्कम महानगरपालिका अर्थसंकल्पामधुन उपलब्ध करून देणे बाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यांत आलेली आहे.

करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.29,97,907/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद जिल्हा नियोजन समिती मधुन वार्ड क्र.106 नक्षत्रवाडी गावांतील पश्चिमेकडील 1.50 कि.मी. रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,97,907/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 35 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या काळानुरुप भरती केलेल्या तासिका तत्वावरील माध्यमीक शिक्षकांना जा.क्र.मनपा/शिक्षण/2016/ 399,दि.15/07/2016 रोजीच्या आदेशान्वये दिनांक 29/02/2016 ते दि.28/03/2016 व दिनांक 30/03/2016 ते दि.27/04/2016 पर्यंत दर 29 दिवसांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून तात्पुरती नियुक्ती/मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सद्यस्थीतीत खालील काळानुरुप भरती केलेले तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक कार्यरत आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नाव | तासिका तत्वावरील शिक्षकांचे नाव | शैक्षणिक पात्रता | अध्यापनाचे विषय | एक महिन्याच्या कमाल 72 तास | प्रतितास मानधन रु. 90/- |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | मा.वि. बेगमपुरा | श्रीमती सुलाखे नीलीमा | बी.ए. बी.एड. | इंग्रजी | 72 तास | रु.90/- |
| 2. | मा.वि. मिटमिटा | श्री. म्हस्के दिनेश जगन्नाथ | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 72 तास | रु.90/- |
| 3. | मा.वि. मिटमिटा | श्रीमती खरात नीता मोतीराम | बी.ए. बी.एड. | मराठी | 72 तास | रु.90/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4. | मा.वि. किराडपुरा नं.1 | श्री. खान शहबाज खुदायार खान | एम.ए. बी.एड. | उर्दु | 72 तास | रु.90/- |
| 5. | मा.वि. किराडपुरा नं. 1 | श्री. शेख जफर | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 72 तास | रु.90/- |
| 6. | मा.वि. शहाबाजार | श्रीमती कुरैशी फातेमा | एम.एस्सी. बी.एड | विज्ञान | 72 तास | रु.90/- |
| 7. | मा.वि. शहाबाजार | श्रीमती सय्यदा फरकुंदा स. इलियास | बी.ए. बी.एड. | इंग्रजी | 72 तास | रु.90/- |
| 8. | मा.वि. शहाबाजार | श्रीमती पटेल हुमैरा अ.बारी | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 72 तास | रु.90/- |
| 9. | मा.वि. सिडको एन-7 | श्री. जाधव व्यंकट भिमराव | बी.ए. बी.एड. | इंग्रजी | 72 तास | रु.90/- |
| 10 | मा.वि. नारेगांव | श्री. श्रीकांत किसनराव शिंदे | एम.एस्सी. बी.एड | विज्ञान | 72 तास | रु.90/- |
| 11 | मा.वि. नारेगांव | श्री. मिर्झा अजमल बेग | एम.ए. बी.एड. | इंग्रजी | 72 तास | रु.90/- |
| 12 | मा.वि.मुकूंदवाडी | श्रीमती सुरेखा द. आक्षे | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 72 तास | रु.90/- |
| 13 | मा.वि.मुकूंदवाडी | श्रीमती पट्टेबहादुर अर्चना नामदेव | बी.ए. बी.एड. | मराठी | 72 तास | रु.90/- |
| 14 | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्री. इंगळे प्रकाश विष्णु | बी.ए. बी.एड. | इंग्रजी | 72 तास | रु.90/- |
| 15 | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती जाधवर सुर्यमाला महादेव | बी.ए. बी.एड. | हिंन्दी | 72 तास | रु.90/- |
| 16 | मा.वि. बन्सीलालनगर | श्रीमती काळे मनिषा रंगनाथ | बी.ए. बी.एड. | इंग्रजी | 72 तास | रु.90/- |
| 17 | मा.वि. बन्सीलालनगर | कु. भडके ताई नारायण | बी.ए. बी.एड. | मराठी | 72 तास | रु.90/- |
| 18 | मा.वि. नारेगांव | श्रीमती फलंब्रीकर अरुणा प्रभाकर | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 72 तास | रु.90/- |
| 19 | मा.वि.बनेवाडी | श्री. सोनवणे राजेंद्र कडुबा | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 72 तास | रु.90/- |
| 20 | मा.वि. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती चव्हाण शुभांगी बलभिमराव | एम.ए. बी.एड. | मराठी | 72 तास | रु.90/- |
| 21 | मा.वि. हर्सुल (म.) | श्री. मोकळे संजय शंकर | बी.ए. बी.एड. | इंग्रजी | 72 तास | रु.90/- |
| 22 | मा.वि. हर्सुल (म.) | श्रीमती भिलेगांवकर प्रेरणा | बी.ए. बी.एड. | मराठी | 72 तास | रु.90/- |
| 23 | मा.वि. प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती कुलकर्णी स्वाती प्रल्हादराव | बी.ए. बी.एड. | मराठी | 72 तास | रु.90/- |

वरीलप्रमाणे कमाल तासांची मर्यादा ठरवुन दिलेली आहे.त्यापेक्षा कोणत्याही तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा केले जाणार नाही याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहिल. याशिवाय शिक्षिकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास त्याची स्वंतत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व तशी मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यात येईल.

वरील कर्मचाऱ्यांना सन 2016-2017 च्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात दर 29 दिवसांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक 15/06/2016 ते (दिवाळीच्या सुट्टया लागेपर्यंत) दिनांक 27/10/2016 पर्यंतची मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या काळानुरुप भरती केलेल्या तासिका तत्वावरील माध्यमीक शिक्षक अ.क्र.01 ते 23 (एकूण 23) कर्मचाऱ्यांना सन 2016-2017 च्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात दर 29 दिवसांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक 15/06/2016 ते (दिवाळीच्या सुट्टया लागेपर्यंत) दिनांक 27/10/2016 पर्यंतची मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 36 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा संकलनाच्या कामासाठी चार चाकी लाईट ट्रान्सपोर्ट व्हेइकल्सचा हायड्रोलिक हॉपर्ससह पुरवठा करणे (50 नग) या कामासाठी ठेकेदार तथा टाटा मोटर्सचे अधिकृत विक्रेते मे.सतिश मोटर्स प्रा.लि. औरंगाबाद यांचेकडून प्रतिनग रूपये 464999/- दराने म्हणजेच निविदा रक्कम रूपये 2,32,49,950/- (रूपये दोन कोटी बत्तीस लक्ष एकोणपन्नास हजार नऊशे पन्नास) प्रमाणे हायड्रोलिक हॉपर्स खरेदी करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : महाराष्ट्र टेंडर्स क्र.2016- एएमसीए-136845-3

| | | |
|---|---|---|
| 1 | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता अ/क/ड |
| 2 | कामाचे स्वरूप | चारचाकी लाईट ट्रान्सपोर्ट व्हेइकल्सचा हायड्रोलिक हॉपर्ससह पुरवठा करणे (50 नग) |
| 3 | पूर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव. | होय, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.294 दि.07/01/2016<br>रक्कम रूपये 23332850/- |
| 3 अ | त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रक्कम रूपये 23332850/- |
| 4 | ज्या वृत्तपत्र/वेबसाईटवर टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महाराष्ट्र ट्रेडर्स दि.09/08/2016 |
| 5-अ | टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दिनांक 09/08/2016 ते दि.13/08/2016 |
| 5-ब | टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.16/08/2016 |
| 6 | एकुण किती टेंडर्स आले | एकुण 03 टेंडर्स |

**त्यापैकी पात्र निविदाधारकांची माहिती**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रूपये | पूर्व गणनपत्रकापेक्षा कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 01. | मे.सतिश मोटर्स प्रा.लि. औरंगाबाद | 23249950/- | रू.82900/- कमी |
| 02. | मे.रत्नप्रभा मोटर्स औरंगाबाद | 23385000/- | रू.52150/- जास्त |
| 03. | मे.पिपाडा मोटर्स, अहमदनगर | 24750000/- | रू.1417150/- जास्त |

| | | |
|---|---|---|
| 7 | सर्वात कमी रकमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय. |
| 7-अ | सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय. |
| 7-ब | जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही. |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8 | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थ शिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | 1. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत प्राप्त शासकीय निधी रू.1,10,00,000/-<br>2. महानगरपालिका फंड 1,23,32,850/- |
| 8-अ | खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय. |
| 9 | सदरचे काम डिपॉझीट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही. |
| 9-अ | असल्यास डिपॉझीट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे? (डिपॉझीट रजिस्टर पान क्र.--) | --- |
| 10 | सोबत मान्य पुर्वगणनपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय. |

तरी विषयांकित काम ठेकेदार मे.सतिश मोटर्स प्रा.लि. यांचेकडून निविदा दरापेक्षा रूपये 82900/- कमी दराने म्हणजेच रक्कम रूपये 2,32,49,950/- मध्ये करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा संकलनाच्या कामासाठी चार चाकी लाईट ट्रान्सपोर्ट व्हेइकल्सचा हायड्रोलिक हॉपर्ससह पुरवठा करणे (50 नग) या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक टाटा मोटर्सचे अधिकृत विक्रेते मे.सतिश मोटर्स प्रा.लि. औरंगाबाद यांचे प्रतिनग रूपये 464999/- प्रमाणे प्राप्त दराने निविदा दरापेक्षा रू.82900/- कमी दराने म्हणजेच निविदा रक्कम रूपये 2,32,49,950/- (रूपये दोन कोटी बत्तीस लक्ष एकोणपन्नास हजार नऊशे पन्नास) प्रमाणे हायड्रोलिक हॉपर्स खरेदी करण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 37 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 2000 लिटर क्षमतेची जेटींग मशिन 5 ते 7 टन क्षमतेच्या चेसीसवर पुरवठा करून उभारणी करणे (06 नग) या कामासाठी ठेकेदार मे.मणियार ॲन्ड कंपनी अहमदाबाद यांचेकडून प्रतिनग रूपये 12,79,877/- दराने म्हणजेच निविदा रक्कम रूपये 76,79,262/- (रूपये शहात्तर लक्ष एकोणएंशी हजार दोनशे बासष्ट फक्त) प्रमाणे जेंटीग मशिन खरेदी करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : महाराष्ट्र टेंडर्स क्र.2016- एएमसीए-143674-1

| | | |
|---|---|---|
| 1 | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता अ/क/ड |
| 2 | कामाचे स्वरूप | 2000 लिटर क्षमतेची जेटींग मशिन 5 ते 7 टन क्षमतेच्या चेसीसवर पुरवठा करून उभारणी करणे (06 नग) |
| 3 | पूर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव. | होय, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.431 दि.10/05/2016<br>रक्कम रूपये 1,47,67,167/- |
| 3 अ | त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रक्कम रूपये 9480570/- |
| 4 | ज्या वृत्तपत्र/वेबसाईटवर टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महाराष्ट्र ट्रेडर्स दि.04/08/2016 |
| 5-अ | टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दिनांक 04/08/2016 ते दि.09/08/2016 |
| 5-ब | टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.18/08/2016 |
| 6 | एकुण किती टेंडर्स आले | एकुण 04 टेंडर्स |

**त्यापैकी पात्र निविदाधारकांची माहिती**

| अ. क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रूपये | पूर्व गणनपत्रकापेक्षा कमी / जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रूपये | टक्केवारी |
| 01 | मे.मणियार ॲण्ड कंपनी, अहमदाबाद | 7679262/- | रू.1801308/- कमी | 19.00 % कमी |
| 02 | मे.आय.पी.डब्ल्यु.टी. कार्पोरेशन, मुंबई | 7793977/- | रू.1686593/- कमी | 17.79 % कमी |
| 03 | मे.कॅमॲविदा एन्व्हायरो इंजि.प्रा.लि.पुणे | 8384616/- | रू.1095954/- कमी | 11.56 % कमी |
| 04 | मे टी.पी.एस. ईन्फ्रास्ट्रक्चर मुंबई | 9290959/- | रू.189611/- कमी | 02.00 % कमी |

| | | |
|---|---|---|
| 7 | सर्वात कमी रकमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय. |
| 7-अ | सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय. |
| 7-ब | जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही. |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8 | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थ शिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नवीन वाहने खरेदी<br>(कोड क्र.-0314160016)<br>सन 2016-14 अर्थसंकल्पीय तरतुद<br>रू.270 लक्ष |
| 8-अ | खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय. |
| 9 | सदरचे काम डिपॉझीट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही. |
| 9-अ | असल्यास डिपॉझीट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे? (डिपॉझीट रजिस्टर पान क्र.---) | --- |
| 10 | सोबत मान्य पुर्वगणनपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय. |

तरी विषयांकित काम ठेकेदार मे.मणियार ॲन्ड कंपनी, अहमदाबाद यांचेकडून निविदा रक्कम रूपये 94,80,570/- पेक्षा रूपये 18,01,308/- कमी म्हणजेच रक्कम रूपये 76,79,262/- मध्ये करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 2000 लिटर क्षमतेची जेटींग मशिन 5 ते 7 टन क्षमतेच्या चेसीसवर पुरवठा करून उभारणी करणे (06 नग) या कामासाठी प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.मणियार ॲन्ड कंपनी अहमदाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर एजन्सीकडून प्रतिनग रूपये 12,79,877/- दराने म्हणजेच निविदा रक्कम रूपये 76,79,262/- (रूपये शहात्तर लक्ष एकोणएंशी हजार दोनशे बासष्ट फक्त) प्रमाणे जेंटीग मशिन खरेदी करण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 38 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनसाठी मोफत अंत्यविधी योजनाची दिनांक 17/12/2012 च्या मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.53 नुसार दिनांक 23/01/2013 पासून सुरू करण्यात आली.

सदर मोफत अंत्यविधी योजनेसाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पातील अतिक्रमण निष्कासीत केलेल्या विकास योजने अंतर्गत रस्त्यांची बांधणी या लेखाशिर्षमध्ये ठेवण्यात आलेली आर्थिक तरतुद रू.10 कोटी मधुन रूपये 2 कोटीची तरतुद वळती करून सुविधा पुरविण्यासाठी तरतुद करण्यात आली होती.

ही योजना राबविण्यासाठी व या योजनेसाठी आर्थिक तरतुद उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून ज्यांना अंत्यविधीचा खर्च स्वतः करावयाची इच्छा असेल तसेच ज्यांना समाजसेवा भावनेतून मदत करावयाची असेल त्यांना ती मदत म्हणुन जमा करण्यासाठी मनपातर्फे एक बँक खाते उघडण्यात आले सर्वसाधारण नागरीकांनी या खात्यात धनादेशाद्वारे इच्छीत रक्कम जमा करावी असे आवाहन करण्यात आले. व दिनांक

23/01/2013 ते 29/03/2015 पर्यंत या मोफत अंत्यविधी योजने करता सर्वसाधारण नागरीकांकडुन बँक खात्यात जमा झालेला निधी अंदाजीत र.रू.2,42,308/- इतकी रक्कम सदरील खात्यावर जमा झाली आहे.

या मोफत अंत्यविधी योजना अंतर्गत अंत्यसंस्काराच्या लाकडाच्या खर्चापोटी प्रत्येक स्मशान जोगीस प्रती अंत्यविधीसाठी रूपये 2500/- इतका खर्च महानगरपालिकेतर्फे अदा केला जात होता.

सदरील मोफत अंत्यविधी योजना दिनांक 23/01/2013 पासून सुरू करण्यात आलेली आहे. मोफत अंत्यविधी योजनेमध्ये दिनांक 23/01/2013 ते 15/03/2015 पर्यंत रूपये 2 कोटी पैकी रूपये 1,99,82,500/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. या योजनेसाठी आर्थिक तरतुदी मधील रूपये 2 कोटी पैकी रूपये 17500/- बाकी आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे मोफत अंत्यविधी योजने अंतर्गत दिनांक 16/03/2015 ते 31/05/2015 या कालावधीचे एकुण रूपये 20,35,000/- (विस लक्ष पस्तीस हजार फक्त) मोफत अंत्यविधी संदर्भात देयक स्मशान जोगी यांना अदा करावयाचे आहे. सदरील विषयांवर झालेला खर्च अदा करणे आवश्यक असल्यामुळे सन 2016-17 च्या अर्थसंकल्पामध्ये या अर्थसंकल्प तरतुदीसाठी Reffrafication of budget head उपलब्ध करून देवून उपरोक्त रक्कम रूपये 20,35,000/- (विस लक्ष पस्तीस हजार फक्त) सर्व संबंधीत स्मशानजोगी यांना त्यांचे देयक अदा करणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे मोफत अंत्यविधी योजने अंतर्गत दिनांक 16/03/2015 ते 31/05/2015 या कालावधीचा झालेला खर्च अदा करणेस तसेच सन 2016-17 च्या अर्थसंकल्पामध्ये या अर्थसंकल्प तरतुदीसाठी Reffrafication of budget head उपलब्ध करून देण्यासह झालेला खर्च रक्कम रूपये 20,35,000/- (विस लक्ष पस्तीस हजार फक्त) सर्व संबंधीत स्मशानजोगी यांना त्यांचे देयक अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 39 :</u>**

उपआयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मनपाच्या विविध विभाग प्रमुखांनी मागणी केल्याप्रमाणे खाजगी सुरक्षा रक्षक पुरविणे आहे. कामाचे आवश्यकता लक्षात घेता कामगार विभागाकडून खाजगी एजन्सीमार्फत खाजगी सुरक्षा रक्षक पुरविण्यात आलेले होते. सदरील सुरक्षा रक्षकांचे काम महाराणा सेक्युरिटी ॲण्ड लेबर सप्लायर्स या कंपनीला देण्यात आलेले आहे. मनपाच्या आस्थापना विभागातर्फे मनुष्यबळ पुरवणे बाबत दिनांक 10/08/2016 रोजी निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. तथापी सदरील प्रक्रीया अंतीम झालेली नाही. करीता आस्थापना विभागामार्फत होणारी नवीन निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत सदरील एजन्सीकडून काम करून घेण्याचा प्रस्ताव ठेवण्यात येत आहे. त्याकरीता खाजगी सुरक्षा रक्षकाचे दर प्रती सुरक्षा रक्षक रूपये 9,987/- राहील व त्यावर सर्व्हिस चार्ज 10% व सर्व्हिस टॅक्स शासनाच्या नियमाप्रमाणे राहील. व त्यावर पी.एफ. व ई.एस.आय. हे वेगळा राहील. 01/05/2016 पासून निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदरील एजन्सीला मंजूरी देण्यांत आलेली आहे.

त्यानुसार वरीलप्रमाणे महाराणा सेक्युरिटी ॲण्ड लेबर सप्लायर्स या एजन्सीला दिनांक 01/05/2016 पासुन पुढील निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत सुरक्षा रक्षक मनपाला गरजेनुसार पुरवठा करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

श्रीमती समीना शेख : विना निविदा यापुर्वी काम दिलेले आहे ते नियमाने केले होते का?आता मंजूरीसाठी का आणले.

श्री.सिताराम सुरे : यापुर्वी या एजन्सीला विना निविदा किती वेळेस मुदतवाढ दिली.

श्री.राजगौरव वानखेडे : यापुर्वी टेंडर काढून एजन्सीला काम दिले होते.कितीदा विना निवीदा मुदतवाढ दिली.

श्री.कैलास गायकवाड : मंजूरी देण्यास हरकत नाही. प्रशासन परस्पर मुदतवाढ देत गेले. सभेत चर्चेला विषय आला होता म्हणून हा प्रस्ताव समोर आला यात म्हटले निविदा होईपर्यंत मुदतवाढ तर किती कालावधीत निविदा काढून प्रोसेस करण्यास लागणार आहे तेवढयाच कालावधीची मुदतवाढ दयावी.

श्री.राजगौरव वानखेडे : महाराणा सेक्युरिटी एजन्सी संदर्भात चौकशी करण्यासाठी समिती नेमली होती बोगस सुरक्षा रक्षक ,काम न करता बील घेतले 47 लक्षचा घोटाळा झालेला आहे असा आरोप होता.त्याचा अहवाल का आला नाही माहिती घ्यावी त्यानंतर निर्णय घ्यावा.

श्रीमती समीना शेख : सर्व माहिती समोर यावी तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

श्री.सिताराम सुरे : एजन्सीची चौकशी करण्यासाठी समिती नेमली होती अहवाल का आलो नाही.

मा.सभापती : प्रशासनाचा ठराव आहे कर्मचा-याची आवश्यकता आहे सध्या वाहनचालकाची गरज आहे.दीड दोन महिणे टेंडर प्रक्रियेस लागतील.यापुर्वी टेंडर न देता मुदतवाढ दिली समीती समोर का आले नाही या एजन्सीने ज्या चुका केल्या प्रशासनाकडूनही काही चुका झाल्या यात जे दोषी आहे कार्यवाही करावी.यापुर्वी एजन्सीला डायरेक्ट काम कसे दिले चौकशी करून समितीसमोर अहवाल दयावा.

श्री.सिताराम सुरे : तोपर्यंत हे स्थगित ठेवावे मुख्य लेखा परीक्षकचा अहवाल आला का ?

श्री.राजगौरव वानखेडे : विकास कामाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष चुकीचे प्रस्ताव आणतात त्यास मंजूरी देणार काय चौकशी समितीचा अहवाल काय आहे ही एजन्सी ब्लॅकलिस्ट केलेली आहे तरीही काम देत आहे.

मा.सभापती : चौकशी करावी अहवाल सादर करावा.विषय मंजूर

श्री.सिताराम सुरे : प्रसताव मंजूर करण्यास माझा विरोध आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : मंजूर करू नये. चौकशी अहवाल येऊ दयावा.

कामगार अधिकारी(श्रीमती थेटे) : 1-7-2014 पासून पुढील सहा महिण्याकरीता मा.आयुक्ताची मंजूरी घेतलेली होती.

श्री.राजगौरव वानखेडे :1/7/14 च्या नंतर सहा महिण्यानंतर म्हणजेच दोन वर्षापासून मंजूरीसाठी का आणले नाही मा.आयुक्तांची मान्यता घेत गेले टेंडरसाठी वेळ नव्हता का? 47 लक्षचा घोटाळा एजन्सीच्या कामात झाला पेपरला बातम्या होत्या निविदा न काढता स्थायी समितीची मंजुरी न घेता मुदतवाढ दिली समीतीच्या अधिकाराचे हणन होत आहे.

उपआयुक्त-आस्थापना : सुरक्षा रक्षक बाबतचे टेंडर 2011 साली झाले त्यानंतर 2014 मध्ये तत्कालीन मा.आयुक्त यांनी 6 महिण्याची मुदत दिली होती पुन्हा सहा महिण्यासाठी मुदत वाढ दिली त्यानंतर 5 महिण्यापासून टेंडर काढण्या बाबत प्रोसेस मध्ये होते एजन्सीच्या चौकशीच्या संदर्भात अहवाल आलेला नाही.

श्री.विकास एडके : टेंडर प्रक्रिया केली असती तर मनपाचा फायदा झाला असता.

मा.सभापती : सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या एजन्सीला यापूर्वी कर्मचारी भरतीला मुतदवाढ नियमाने दिली का, टेंडर का काढण्यात आले नाही, या एजन्सीच्या संदर्भात भ्रष्टाचार झाल्याच्या बातम्या आलेल्या होत्या, बोगस कर्मचारी होते काय, ही एजन्सी ब्लॅकलीस्ट आहे काय, या एजन्सी बाबत चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती, यापूर्वी कोणकोणत्या चुका एजन्सीच्या माध्यमातून झालेल्या आहेत, या सर्व बाबतीत माहिती घेऊन चौकशी करून अहवाल सादर करावा, या विषयाला मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या विविध विभाग प्रमुखांनी मागणी केल्याप्रमाणे खाजगी सुरक्षा रक्षक पुरविणे करीता व या कामासाठी दिनांक 10/08/2016 रोजी निविदा मागविण्यात आलेल्या असल्यामुळे, सदरील प्रक्रीया अंतीम झालेली नसल्याने आस्थापना विभागामार्फत होणारी नवीन निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत महाराणा सेक्युरिटी ॲण्ड लेबर सप्लायर्स या एजन्सीकडून काम करून घेण्यास व त्याकरीता खाजगी सुरक्षा रक्षकाचे दर प्रती सुरक्षा रक्षक रूपये 9,987/- प्रमाणे व त्यावर सर्व्हिस चार्ज 10% व सर्व्हिस टॅक्स शासनाच्या नियमाप्रमाणे राहील तसेच त्यावर पी.एफ. व ई.एस.आय. हे वेगळा राहील यासह दिनांक 01/05/2016 पासून पुढील निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत महाराणा सेक्युरिटी ॲण्ड लेबर सप्लायर्स या एजन्सीकडून सुरक्षा रक्षक मनपाला गरजेनुसार पुरवठा करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 40 :**

उपआयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मनपाच्या यांत्रिकी विभागासाठी खाजगी वाहन चालकाची आवश्यकता असल्यामुळे व मनपाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे कामाची आवश्यकता लक्षात घेता खाजगी एजन्सीमार्फत खाजगी वाहन चालक पुरविण्यात आले होते. सदरील वाहन चालकाचे काम महाराणा रेक्युरिटी ॲण्ड लेबर सप्लायर्स या कंपनीला देण्यात आलेले आहे. मनपाच्या आस्थापना विभागातर्फे मनुष्यबळ पुरवणे बाबत दिनांक 10/08/2016 रोजी निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. तथापी सदरील प्रक्रीया अंतिम झालेली नाही. करीता आस्थापना विभागामार्फत होणारी नवीन निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत सदरील एजन्सीकडून काम करून घेण्याचा प्रस्ताव ठेवण्यात येत आहे. त्याकरीता खाजगी वाहन चालकाचे दर प्रती महिन्याला किमान वेतनानुसार वेतन राहील व त्यावर सर्व्हिस चार्ज 10% राहील व सर्व्हिस टॅक्स शासनाच्या नियमाप्रमाणे राहील. व त्यावर पी.एफ. व ई.एस.आय. हे वेगळा राहील. 01/01/2016 पासुन निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत सदरील एजन्सीला मंजूरी देण्यांत आलेली आहे.

त्यानुसार वरीलप्रमाणे एजन्सीला मागील कार्योत्तर मंजुरी देऊन पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत खाजगी वाहन चालक मनपाला गरजेनुसार पुरवठा करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

श्रीमती समीना शेख : मंजूर करण्यास माझा विरोध आहे. एजन्सी बोगस आहे चौकशी चालू आहे असे असतांना त्याच एजन्सीला काम देणे योग्य नाही.

श्री.सिताराम सुरे : माझा विरोध नोंदवावा. मंजूर करू नये अहवाल मागवावा.

मा.सभापती : सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या एजन्सीला यापूर्वी कर्मचारी भरतीला मुतदवाढ नियमाने दिली का, टेंडर का काढण्यात आले नाही, या एजन्सीच्या संदर्भात भ्रष्टाचार झाल्याच्या बातम्या आलेल्या होत्या, बोगस कर्मचारी होते काय, ही एजन्सी ब्लॅकलीस्ट आहे काय, या एजन्सी बाबत चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती, यापूर्वी कोणकोणत्या चुका एजन्सीच्या माध्यमातून झालेल्या आहेत, या सर्व बाबतीत माहिती घेऊन चौकशी करून अहवाल सादर करावा, या विषयाला मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या यांत्रिकी विभागासाठी खाजगी वाहन चालकाची आवश्यकता असल्यामुळे व मनपाकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे कामाची आवश्यकता लक्षात घेता खाजगी एजन्सीमार्फत खाजगी वाहन चालक पुरविण्यात आले असून सदरील वाहन चालकाचे काम महाराणा रेक्युरिटी ॲण्ड लेबर सप्लायर्स या कंपनीला देण्यात आलेले असल्यामुळे व मनपाच्या आस्थापना विभागातर्फे मनुष्यबळ पुरवणे बाबत दिनांक 10/08/2016 रोजी निविदा मागविण्यात आलेल्या असल्याने व सदरील प्रक्रीया अंतिम झालेली नसल्याने आस्थापना विभागामार्फत होणारी नवीन निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत सदरील एजन्सीकडून काम करून घेण्यास आणि त्याकरीता खाजगी वाहन चालकाचे दर प्रती महिन्याला किमान वेतनानुसार वेतन राहील व त्यावर सर्व्हिस चार्ज 10% राहील व सर्व्हिस टॅक्स शासनाच्या नियमाप्रमाणे राहील व त्यावर पी.एफ. व ई.एस.आय. हे वेगळा राहील करीता दिनांक 01/01/2016 पासुन निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत सदरील

एजन्सीला मागील कार्योत्तर मंजुरी देऊन पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत खाजगी वाहन चालक मनपाला गरजेनुसार पुरवठा करण्यासह मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 41 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरातील सातारा - देवळाई प्रभागात नक्षत्रवाडी पंपगृह येथील वॉटर टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे या कामाचे ठेकेदार मे. शेख कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांचेकडून टँकर भाडे प्रति टन प्रति दिन रु. 175/- व प्रति टन प्रति कि.मी. रु. 2.30 दराने अंदाजपत्रकीय रक्कम रु.3,32,31,960/- पर्यंत करुन घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

**संदर्भः-** टेंडर क्र. 19-16-85-A सन: 2016.

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा |
| 2. | कामाचे स्वरुप | औरंगाबाद शहरातील सातारा-देवळाई प्रभागात नक्षत्रवाडी पंपगृह येथून वॉटर टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, रक्कम रु. 3,32,31,960/-, ठराव क्र. 182 दिनांक 19.11.2015. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रक्कम रु. 3,32,31,960/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई- निविदा विभागामार्फत, दिनांक 26/05/2016. |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दिनांक 2/06/2016 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दिनांक 15.06.2016 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एकुण 2 (दोन), 2 पात्र |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| **अ.क्र.** | **निविदा धारकाचे नाव** | **1 मे. टन** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रति दिन भाडे | | प्रति कि.मी. भाडे | |
| | | रक्कम रुपये | अक्षरी रु. | रक्कम रुपये | अक्षरी रु. |
| 1. | मे.शेख कन्स्ट्रक्शन औरंगाबाद | 184/- | एकशे चौ-यांशी | 2.50 | दोन रुपये पन्नास पैसे |
| 2 | मे.पवार वॉटर सप्लायर्स औरंगाबाद. | 185/- | एकशे पंच्यांशी | 2.50 | दोन रुपये पन्नास पैसे |

वाटाघाटी अंती मे. शेख कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांचे खालील प्रमाणे निविदेतील दर

| **अ.क्र.** | **निविदा धारकाचे नाव** | **1 मे. टन** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रति दिन भाडे | | प्रति कि.मी. भाडे | |
| | | रक्कम रुपये | अक्षरी रु. | रक्कम रुपये | अक्षरी रु. |
| 1. | मे. शेख कन्स्ट्रक्शन औरंगाबाद | 175/- | एकशे पंच्याहत्तर | 2.30 | दोन रुपये तीस पैसे |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थ शीर्षकावर पडणार आहे? ते शीर्षक नमूद करावे. | पाणी टंचाई टँकर भाडे, कोड नं. - रु. 400 लक्ष |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणनपत्रकाच्या विषयपत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तातडीची गरज लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाने नियुक्त केलेले ठेकेदार मे. चांगदेव नारायण कातकडे यांचे पाण्याचे टँकर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दरानूसार सातारा-देवळाई भागातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यासाठी दिनांक 23.01.2016 पासून कार्यरत आहे. या कामासाठी दिनांक 30.04.2016 पर्यंत झालेला खर्च रक्कम रु.29,99,047/- व नविन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत होणाऱ्या वाढीव खर्चासह मे. चांगदेव नारायण कातकडे यांचे टँकर कार्यरत ठेवणेस मान्यतेसाठी सादर.

तरी विषयांकीत काम ठेकेदार मे.शेख कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांचेकडून प्रति टन प्रति दिन रु.175/- व प्रति टन प्रति कि.मी. रु.2.30 दराने अंदाजपत्रकीय रक्कम रु.3,32,31,960/- पर्यंत करुन घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय क्र.41 ते 46 मंजुर करण्यांत येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील सातारा-देवळाई प्रभागात नक्षत्रवाडी पंपगृह येथील वॉटर टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.शेख कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचेकडून टँकर भाडे प्रति टन प्रति दिन रु.175/- व प्रति टन प्रति कि.मी. रु.2.30 दराने अंदाजपत्रकीय रक्कम रु.3,32,31,960/- पर्यंत करुन घेणेस व करार करणेस मान्यता देण्यांत येते. तसेच तातडीची गरज लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाने नियुक्त केलेले ठेकेदार मे.चांगदेव नारायण कातकडे यांचे पाण्याचे टँकर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दरानूसार सातारा-देवळाई भागातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यासाठी दिनांक 23.01.2016 पासून कार्यरत असल्यामुळे, या कामासाठी दिनांक 30.04.2016 पर्यंत झालेला खर्च रक्कम रु.29,99,047/- व नविन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत होणाऱ्या वाढीव खर्चासह मे.चांगदेव नारायण कातकडे यांचे टँकर कार्यरत ठेवणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 42 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, संजयनगर खासगेट गंजेशहीदा मुख्य रस्ता व्हाईट टॉपींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2015-16 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.39,99,000/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील SCR ward-C पान क्रं. 22 अनु.क्रं.50 मध्ये उपलब्ध नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षकात ठेवण्यात आलेल्या 40.00 लक्ष तरतुद मधुन करण्यात येणार आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात रस्त्यास, वेट मिक्स करणे, व्हाईट टॉपींग करणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाचे रक्कम रू.39,99,000/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर खासगेट गंजेशहीदा मुख्य रस्ता व्हाईट टॉपींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.39,99,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 43 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.01,03,04,05,11,21,22,23,49,52 आणि वॉर्ड क्र.01 कार्यक्षेत्रातील विविध रस्त्यांची दुरूस्ती व डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.49,98,588/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचा खर्च सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.49,98,588/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.01,03,04,05,11,21,22,23,49,52 आणि वॉर्ड क्र.01 कार्यक्षेत्रातील विविध रस्त्यांची दुरूस्ती व डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.49,98,588/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 44 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.89, चिकलठाणा येथील हनुमान चौक ते विमानतळ संरक्षक भिंती पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीट करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 2696768/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2016-2017 च्या आर्थिक वर्षात नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षामधुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देऊन मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

तरी रक्कम रू.2696768/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.89, चिकलठाणा येथील हनुमान चौक ते विमानतळ संरक्षक भिंती पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीट करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.2696768/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 45 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रतिवर्षी प्रमाणे सन 2016-17 या शैक्षणिक वर्षात महानगरपालिका शाळेतील इयत्ता बालवाडी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश खरेदीसाठी प्रती विद्यार्थी रु.400/- (ज्यात- दोन गणवेश खरेदी व शिलाई समाविष्ठ) अशाप्रमाणे एकूण 8,075 विद्यार्थ्यांना एकूण रक्कम रु.32,30,000=00 (अक्षरी बत्तीस लक्ष तीस हजार रुपये फक्त) खर्च अपेक्षित आहे.

सदर खर्च हा शिक्षण विभागाच्या लेखाशिर्षा अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत करण्यात येईल.

| अ.क्र. | केद्रांचे नाव | एकूण वंचित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | मनपा के.प्रा.शा.किराडपुरा-1 | 1201 |

| | | |
|---|---|---|
| 2 | मनपा के.प्रा.शा.सिडको एन-12 | 414 |
| 3 | मनपा नुतन मा..शा.ज्युब्ली पार्क | 483 |
| 4 | मनपा के.प्रा.शा.हर्सुल गाव | 494 |
| 5 | मनपा के .प्रा. व मा.इंदिरानगर बायजीपुरा | 586 |
| 6 | मनपा के.प्रा.शा.सिडको एन-07 | 1615 |
| 7 | माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी | 587 |
| 8 | मनपा के.प्रा.शा. बनेवाडी | 1013 |
| 9 | मनपा के.प्रा.शा. बेगमपुरा | 727 |
| 10 | मनपा के.प्रा.शा. प्रियदर्शनीनगर इंदिरानगर | 647 |
| 11 | मनपा के.प्रा.शा. बन्सीलाल नगर | 308 |
| | एकूण लाभार्थी → | 8075 |

सदर दर्शविलेले लाभार्थी हे सर्व शिक्षा अभियान योजना व्यतिरिक्त लाभार्थी आहे. तथा सदर गणवेश खरेदीसाठी, शालेय व्यवस्थापन समिती मार्फत मुख्याध्यापकांच्या नांवे प्रत्यक्ष शाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थिती संख्येनूसार प्रति विद्यार्थी रु. 400/- प्रमाणे धनादेश स्वरुपात निधी वितरण करण्यात येईल. सदर निधीचा विनियोग खालील दिलेल्या निर्देशानूसार करावयाचा आहे.

- गणवेशाकरिता कापडाची खरेदी शाळा व्यवस्थापन समितीने करावी. सदर कापडाची खरेदी करतांना कोणत्याही राज्य/केंद्र शासनाच्या सहकारी संस्था, राष्ट्रीय वस्त्रोद्योग संस्था किंवा इतर संस्था यांना प्राधान्य देण्यात येवू नये.
- शाळांनी गणवेश कपडाच्या खरेदीसाठी कमीत कमी तीन पुरवठाधारकांची अटी व शर्तीसह दर पत्रके मागावावीत.शाळांनी दरपत्रके मागवीतांना त्यामध्ये कापडांचे विवरण(Discription),वैशिष्ट्ये (Specification),रंग (Color),मुले व मुलींसाठी वेगवेगळे नग(Quantity) व पुरवठा कालावधी नमूद करावा.
- शाळा व्यवस्थापन समितीस कापडाची वैशिष्ट्ये (Specification) माहित नसल्यास दरपत्रके मागविताना आवश्यक असलेल्या गणवेश कापडाचा नमूना पुरवठादारास पाठवावा व त्यानुसार दरपत्रके मागवावित.
- दरपत्रके मागविण्याचा कालावधी पुर्ण झाल्यावर शाळा व्यवस्थापन समितीने दरपत्रके उघडून अटी व शर्ती पूर्ण करणार व कमीत कमी दर ज्या पुरवठाधारकांचे असतील त्या पुरवठाधारकास कापडपुरवठा करण्याकामी पुरवठा आदेश निर्गमित करावा.
- प्रत्येक शाळा व्यवस्थापन समितीने त्यांच्या शाळेतील पात्र लाभार्थ्यांच्या वयोगटानुसार व विद्यार्थ्यांच्या मापानुसार (Size प्रमाणे) मुलांसाठी आणि मुलींसाठी लागणाऱ्या कापडाची यादी तयार करुन कापडाची खरेदी करावी.
- कापडाची शिलाई करणेकामी संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने अटी व शर्तीसह दरपत्रके मागवावी. गणवेश कापड व शिलाई यासाठी मंजूर तरतुदीच्या अधिन राहून वेगवेगळी दरपत्रके मागवावी.
- गणवेश कापड व शिलाई यांच्या देयकाची अदाई संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने धनादेशाद्वारे करावी. रोख स्वरुपात अदायगी करु नये.
- शाळा स्तरावर दिनांकनिहाय संपूर्ण हिशोब ठेवण्यात यावा.
- गणवेश शिवुन झाल्यानंतर त्यांची तांत्रिक समितीद्वारे तपासणी करुन घेण्यात यावी. त्यांचा योग्य अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंजूर तरतूदीमधील रक्कम शिल्लक असल्यास, सदर रक्कम त्याच आर्थिक वर्षात मनपा स्तरावर जमा करावी व विनियोग प्रमाणपत्र सादर करुन त्याचे रेकॉर्ड ठेवण्यात यावे. करिता वरिलप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेतून गणवेश खरेदीसाठी अनुदान निधी वितरित करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रतिवर्षी प्रमाणे सन 2016-17 या शैक्षणिक वर्षात महानगरपालिका शाळेतील इयत्ता बालवाडी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश खरेदीसाठी प्रती विद्यार्थी रु.400/- (ज्यात- दोन गणवेश खरेदी व शिलाई समाविष्ठ) अशाप्रमाणे एकूण 8,075 विद्यार्थ्यांना एकूण रक्कम रु.32,30,000=00 (अक्षरी बत्तीस लक्ष तीस हजार रुपये फक्त) अपेक्षित खर्चास मान्यता देण्यांत येते, सदर गणवेश खरेदीसाठी, शालेय व्यवस्थापन समिती मार्फत मुख्याध्यापकांच्या नांवे प्रत्यक्ष शाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थिती संख्येनूसार प्रति विद्यार्थी रु.400/- प्रमाणे धनादेश स्वरुपात निधी वितरण करण्यास व सदर निधीचा विनियोग प्रस्तुत प्रस्तावातील दिलेल्या निर्देशानूसार करावयास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 46 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री.अनिल त्रिंबकराव ताठे, कनिष्ठ लिपीक, वॉर्ड क्र.7 कार्यालय यांच्या पत्नीच्या कर्करोगावर (Metastic Adencorcionoma) उपचारापोटी रक्कम रू.5,41,119/- (अक्षरी रू.पाच लाख एक्केचाळीस हजार एकशे एकोणावीस फक्त) इतका खर्च झाला आहे.

महानगरपालिका वैद्यकीय परतावा विनियमामध्ये या आजाराचा आकस्मिक आजार म्हणुन समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने संबंधीताने सदर आजारपणावर केलेल्या वैद्यकीय खर्च रू.5,41,119/- एवढा खर्च झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.5,29,400/- एवढी आहे. सदरील अनुज्ञेय रक्कमेच्या 90% रक्कम रू.4,76,460/- (अक्षरी रू.चार लाख शहात्तर हजार चारशे साठ फक्त) पैकी 5% रक्कम रूपये 27,055/- (अक्षरी रू.सत्तावीस हजार पंचावण्ण फक्त) (एकूण सादर केलेले देयक रक्कम रू.5,41,119/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रूपये 4,49,405/- (अक्षरी रू.चार लाख एकोणपन्नास हजार चारशे पाच फक्त) रक्कम देय आहे.

करीता श्री.अनिल त्रिंबकराव ताठे, कनिष्ठ लिपीक यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.5,29,400/- च्या 90% रक्कम रू.4,76,460/- (अक्षरी रू.चार लाख शहात्तर हजार चारशे साठ फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अनिल त्रिंबकराव ताठे, कनिष्ठ लिपीक, वॉर्ड क्र.7 कार्यालय यांच्या पत्नीच्या कर्करोगावर (Metastic Adencorcionoma) उपचारापोटी केलेल्या रक्कम रू.5,41,119/- (अक्षरी रू.पाच लाख एक्केचाळीस हजार एकशे एकोणावीस फक्त) प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.5,29,400/- व सदरील अनुज्ञेय रक्कमेच्या 90% रक्कम रू.4,76,460/- (अक्षरी रू.चार लाख शहात्तर हजार चारशे साठ फक्त) पैकी 5% रक्कम रूपये 27,055/- (अक्षरी रू.सत्तावीस हजार पंचावण्ण फक्त) (एकूण सादर केलेले देयक रक्कम रू.5,41,119/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रूपये 4,49,405/- (अक्षरी रू.चार लाख एकोणपन्नास हजार चारशे पाच फक्त) रक्कम देय असल्यामुळे, श्री.अनिल त्रिंबकराव ताठे, कनिष्ठ लिपीक यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.5,29,400/- च्या 90% रक्कम रू.4,76,460/- (अक्षरी रू.चार लाख शहात्तर हजार चारशे साठ फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 47 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.113, भारतनगर येथील जलनि:सारण वाहिनी बदलणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन 2012-2013 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 2552165/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2016-

2017 च्या आर्थिक वर्षात स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत अधिकृत/अनाधिकृत वसाहती मध्ये ड्रेनेज लाईन व सेफ्टीक बांधणे या कामासाठी रक्कम रूपये 5 कोटी मधुन प्रस्तावित आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देऊन मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

तरी रक्कम रूपये 2552165/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : ऐनवेळचे सर्व विषय मंजूर (विषय क्रमांक 47,48,49)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.113, भारतनगर येथील जलनि:सारण वाहिनी बदलणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 2552165/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 48 :**

मा.आयुक्त यांचे मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.72 अंतर्गत राठी टॉवर जवळील नाल्यावर बॉक्स कल्व्हर्ट बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.30,61,921/- चे तयार करण्यांत आले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च मा.महापौर यांनी सुचविलेल्या अत्यावश्यक कामे या लेखाशिर्ष अंतर्गत महानगरपालिकेच्या सन 2016-2017 च्या अर्थसंकल्प पुस्तिकेतील पान क्र.-ई 58 अ.क्र.08 करण्यात आलेल्या रक्कम रू.1500.00 लक्ष मधुन करण्यात येणार आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय, यांनी प्रशासकीय मान्यता देऊन मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत शिफारस केलेली आहे.

करीता उपरोक्त नमुद प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.30,61,921/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.72 अंतर्गत राठी टॉवर जवळील नाल्यावर बॉक्स कल्व्हर्ट बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.30,61,921/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 49 :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्री.एस.आर.जरारे, वॉर्ड अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वत:च्या हृदयाच्या आजारपणावर (Double Vessel Disease) उपचारासाठी अग्रीम रू.2,25,000/- (अक्षरी रू.दोन लाख पंचवीस हजार मात्र) मंजूर करून अदा करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने सदर अग्रीमचे समायोजन करण्यासाठी संबंधीतांनी दाखल केलेल्या वैद्यकीय देयक रू.2,49,302/- पैकी अनुज्ञेय रू.2,34,331/- च्या 90% रक्कम रू.2,10,898/- (अक्षरी रू.दोन लाख दहा हजार आठशे अठ्ठ्याण्णव मात्र) पैकी 5% रक्कम रू.12,465/- (अक्षरी रू.बारा हजार चारशे पासष्ट मात्र) (एकूण दाखल केलेले देयके रक्कम रू.2,49,302/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.1,98,433/- (अक्षरी रू.एक लाख अठ्ठ्याण्णव हजार चारशे तेहतीस मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

करिता, श्री.एस.आर.जरारे, वॉर्ड अधिकारी यांना अदा केलेले अग्रीम रक्कम रू.2,25,000/- मंजूर करून या अग्रीम रकमेतून रू.1,98,433/- वजा जाता, सदर रकमेचे समायोजन करून उर्वरीत फरकाची रक्कम रू.26,561/- (अक्षरी रू.सव्वीस हजार पाचशे एकसष्ट मात्र) मनपा फंडात जमा करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.एस.आर.जरारे, वॉर्ड अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वत:च्या हृदयाच्या आजारपणावर (Double Vessel Disease) केलेल्या खर्चाचे समायोजन करण्यासाठी संबंधीतांनी दाखल केलेल्या वैद्यकीय देयक रू.2,49,302/- पैकी अनुज्ञेय रू.2,34,331/- च्या 90% रक्कम रू.2,10,898/- (अक्षरी रू.दोन लाख दहा हजार आठशे अठ्ठयाण्णव मात्र) पैकी 5% रक्कम रू.12,465/- (अक्षरी रू.बारा हजार चारशे पासष्ट मात्र) (एकूण दाखल केलेले देयके रक्कम रू.2,49,302/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून श्री.एस.आर.जरारे, वॉर्ड अधिकारी यांना अदा केलेले अग्रीम रक्कम रू.2,25,000/- मंजूर करून या अग्रीम रकमेतून रू.1,98,433/- वजा जाता, सदर रकमेचे समायोजन करून उर्वरीत फरकाची रक्कम रू.26,561/- (अक्षरी रू.सव्वीस हजार पाचशे एकसष्ट मात्र) मनपा फंडात जमा करण्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.विकास एडके : सीटीएस नंबर 7661 मंजुरपूरा याला टीडीआर दिला का?

शाखा अभियता (श्री.कोंबडे): श्री.देशमुख साहेब हे मा.न्यायालयात कामा निमित्ताने गेलेले आहे.त्यांना हे प्रकरण माहित असल्याने तेच माहिती देऊ शकतील.

श्री.विकास एडके : 1997 ला स्थायी समितीने प्रस्ताव पास करून 7661,7663 या सीटीएस नंबरला कॉम्पॅजेशन देऊन 8.25लक्ष दिले पुन्हा टीडीआर कसा देत आहोत.

श्रीमती संगीता वाघुले : अधिकारी नाही प्रत्येक वेळेस अधिकारी नसतात आमच्या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही.

श्रीमती मनीषा मुंढे : महापालिकेची लाईट एमएसईबीने बंद केली असे ऐकण्यात आले मनपाच्या अखत्यारीत असलेले किती मिटर चालू ,बंद किती आहे.

उपअभियंता-श्री.देशमुख: एकूण 1400 मीटर आहे किती बंद किती चालू त्याची डिटेल माहिती आता नाही.

श्री.रावसाहेब आमले : लाईटची कामे बंद आहे. एजन्सीला मुदतवाढ दिली काय ?

उपअभियंता-श्री.देशमुख: मुदत संपलेली होती दोन महिण्याकरीता एजन्सीला मुदतवाढ दिली आहे.

श्री.कैलास गायकवाड : मुदत संपल्यानंतर लगेच टेंडर का काढले जात नाही.प्रत्येक वेळी उशीर होतो म्हणून टेंडर अबाऊ येते नाविलाजाने त्या एजन्सीला काम दयावे लागते मनपाचे यात नुकसान होते

उपअभियंता-श्री.देशमुख: जुलै मध्ये टेंडर संपले आहे.आता मुदतवाढ दिली आहे.

अति.आयुक्त : मा.आयुक्तांनी दोन महिण्यासाठी मान्यता दिली लगेच कामास सुरूवात करण्याचे आदेशीत केले जाईल.

श्री.नितीन चित्ते : या विभागात एक अधिकारी सर्वच काम पाहू शकत नाही आणखी अभियंता देणे आवश्यक आम्ही प्रश्न मांडतो कर्मचारी नसल्याचेच उत्तर मिळते. कर्मचारी असेल तरच कामेही होतील हे सुध्दा विचारात घेतले पाहिजे.ठेकेदारास मुदत दिली नाही , कर्मचारी नाही म्हणून काम होत नाही मीटर चालू आहे विषय निघाला चौकशी करावी. किती बील महापालिका पेड करते मी पत्र दिले त्याची माहिती मला मिळाली नाही काही ठिकाणी मनपाच्या मालमत्ता चालविण्यासाठी भाडेने ते बील मनपा भरते अशी परीस्थिती याकडे कुणाचे लक्ष नाही.रेणुकामाता मंदीर जवळ हायमास्ट बंद आहे प्रत्येक वार्डात कामे व्हावी.ही सदस्यांची भावना असते. आउट सोसींगने कर्मचारी घ्यावे.प्रमोद महाजन क्रिडा संकुल येथे सुरक्षा नाही.मोठा खर्च करून ते क्रिडा संकुल बांधले दक्षता कुणी घेत नाही.

| | |
|---|---|
| अति.आयुक्त | : नॉमनुसार कर्मचारी संख्या कमी आहे आऊट सोसींगवर कर्मचारी भरती संदर्भात टेंडर काढले प्रोसेस चालू आहे उदया मुदत संपत आहे टेंडर उघडले जाईल महापालिकेच्या मिळकती मोठया आहे तेथे सुरक्षा रक्षक आवश्यक आहे तसेच मनपाकडे वाहनाची संख्या मोठी आहे त्यासाठी वाहन चालकही आवश्यक आहे. कर्मचारी भरती होत नाही तोपर्यत व्यवस्थीत वेळेवर काम होणे शक्य नाही. विदयुत विभाग असेल कोणत्या विभागासाठी आवश्यक कर्मचारी असेल तर कामे करणे सुखर होईल. |
| श्री.नितीन चित्ते | : झोन 4 मध्ये फवारणीसाठी कर्मचारी कमी आहे फवारणी होत नाही. सेवानिवृत्त कर्मचारी काम करण्यास तयार आहे त्यांची नियुक्ती करावी फवारणीसाठी महापालिकेच्या इतर विभागात कामासाठी कर्मचारी दयावे. |
| मा.अति.आयुक्त | : आऊट सोर्सींग वर कर्मचारी घेणे बाबत 3-4 वेळेस टेंडर झाले टेंडर अंतिम झालेले नाही. |
| उपआयुक्त-आस्थापना | : तीन वेळेस टेंडर केले पहिल्या वेळेस 7 टेंडर आले एकही पात्र नाही दुस-या वेळेस एकच पात्र एजन्सी होती तिस-या वेळेस एकच टेंडर आले त्यामूळे उशीर होत आहे. |
| श्री.नितीन चित्ते | : एकाच ठिकाणी सर्व टेंडर प्रोसेस होते हेडवाईज टेंडर असावे टेंडर विभागात दोन कर्मचारी काम करतात महापालिकेने सर्वेवर घ्यावे टेंडर प्रक्रिया लवकर होईल सर्व विभागात कर्मचारीआवश्यकतेनुसार पुरवावे तरच वेळेवर कामे होतील.टेंडर कॅन्सल झाल्यानंतर महापालिकेचे नुकसान होते. |
| अति.आयुक्त | : महा ई टेंडर सेवा फ्रि मध्ये आहे दिवसा इन्टरनेट मध्ये प्रॉब्लेम येतो रात्रीच्या वेळी बसून काम करावे लागते राज्य शासनाचे सर्व काम त्यावरच चालते.तांत्रिक अडचणी येतात.त्यामूळे उशीर लागतो. |
| श्रीमती मनिषा मुढे | : रस्ता खोदून भुमीगट ड्रेनेजचे काम होत आहे नंतर रस्ता दुरूस्त केला जात नाही. |
| श्री.कैलास गायकवाड | : जयभवानीनगर रस्त्यावरील तसेच रेल्वेपटरीच्या बाजूला असलेले अतिक्रमण काढून केंव्हा ड्रेनेज लाईनचे काम होणार आहे. |
| कार्य.अभियंता-ड्रेनेज | : पावसाळयानंतर या भागातील अतिक्रमण काढले जाणार आहे त्यानंतर त्याच दिवशी ड्रेनेज लाईनचे काम सुरू होईल.साडे तेरा कि.मीटरचे रस्ते खोदले आहे त्यावर काही ठिकाणी काम केले काही बाकी आहे लेव्हल करून त्यावर मुरूम व डांबराचा थर देऊन रेस्ट्रोरेशन करून खड्डे बुजविले जात आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : एजन्सीला किती बील दिले दोन वेळेस ऑडीट करावे लागते नागपूर लेखा परीक्षक होते मनपाचे ऑडीट होणे आवश्यक आहे.अदयाप का केले नाही. |
| कार्य.अभियंता-ड्रेनेज | : 182 कोटी रक्कम दिली आहे ऑडीट साठी लेखा परीक्षण यांचेकडे उदयाच रेकॉर्ड पाठविले जाईल. |
| श्री.रावसाहेब आमले | : 115 वार्डपैकी एमआयएम सदस्य असलेल्या वार्डात किती कामे झालेली आहे. पडेगाव मिटमिटा वार्डात ड्रेनेज लाईनचे अदयाप काम सुरू केले नाही. |
| कार्य.अभियंता-ड्रनेज | : एका वार्डात किती काम झाले ते आताच सांगू शकत नाही आठ दिवसात पडेगाव भागात काम सुरू होईल.हायवे रस्त्याच्या बाजूला जागा उपलब्ध नव्हती नॅशनल हायवे विभागाचे अधिकारी यांचेशी चर्चा केली. |
| मा.सभापती | : स.श्री.आमले यांचे वार्डात आठ दिवसाच्या आत काम सुरू करावे. |
| श्री.मकरंद कुलकर्णी | : श्री.अफसर सिद्यीकी यांचेकडून ड्रेनेज लाईन योजनेचा चार्ज काढण्यात यावा. |

श्री.कैलास गायकवाड : मालमत्ता, एलबीटी व इतर वसुली किती झालेली आहे वसुली झाली तर विकास कामे होतील.

मा.सभापती : वसुली संदर्भात विशेष सभा घेता येईल.

श्री.राजगौरव वानखेडे : भुमीगट गटार योजनेत एसटीपी प्लॅन्ट किती होते.

कार्य.अभियंता-ड्रेनेज : एकूण सहा प्लॅन्ट होते त्यापैकी एअर पोर्ट प्राधिकरणा जवळील प्लॅन्ट करण्यास प्राधिकरणाने विरोध केलेला आहे तो प्लॅन्ट झाल्टा येथे जोडण्यात आला.तेथील प्लॅन्टची क्षमता वाढविण्यात आली.सिध्दार्थ उदयान जवळील प्लॅन कांचनवाडी भागातील प्लॅन्टला जोडला तेथील क्षमता वाढविली बनेवाडी 30 कॅपॅसीटीचा प्लॅन्ट होता तेथे शाळा मध्ये येते रोड कमी पडला.

श्री.राजगौरव वानखेडे : दोन प्लॅन्ट कमी केले योजनेच्या खर्च ही कमी किती कमी झाला.

कार्य.अभियंता-ड्रेनेज : योजनेच्या खर्चात 1.25 कोटीची बचत होत आहे प्लॅन्ट जरी रद्य केले तरी ज्या प्लॅन्टला ते मिळविले त्याची क्षमता वाढविली आहे.खर्चामध्ये फारसा फरक पडलेला नाही.

श्री.विकास एडके : एमआयएम सदस्यांच्या वार्डात किती कामे केली असे जाणीवपुर्वक प्रश्न का केला.आमच्या वार्डात इतर प्रोजेक्ट मधून कामे कमी झालेली आहे.

यावेळी स.सदस्य मोठमोठयाने एकाच वेळी बोलत असतात.

मा.सभापती : ठराविक वार्डातच ड्रेनेज लाईनचे काम होत असेल तर योग्य नाही सर्वच वार्डात कामे व्हावीत कोणत्या भागात किती कामे केली पुढील बैठकीत सविस्तर अहवाल सादर करावा.

श्री.कैलास गायकवाड : अर्थसंकल्प मंजूर केला उद्दिष्ठ दिल्यानुसार मालमत्ता कर व एलबीटीची किती वसुली झाली.कर्मचारी वेतनावर किती खर्च होतो व वसुली किती सर्व मागिल वर्षी 15-15 लक्ष वार्डातील कामासाठी दिले होते त्यातून कामे झाली परंतु या वर्षी प्रत्येक वार्डसाठी 1 कोटी देणार असे प्रशासनाने सांगितले अदयाप काम चालू नाही. शहरातील आवश्यक सोयी सुविधा नागरीकांना मिळत नाही. रस्ते दुरूस्त होत नाही.याकडे लक्ष देण्याची गरज आहे.रस्ते दुरूस्तीचे काम होणार की नाही.

मा.सभापती : या बाबत विशेष बैठक आयोजित केली जाईल.

श्रीमती किर्ती शिंदे : नवाबपुरा वार्डात म्हशीचे गोठे आहेत तेथे साफसफाई होत नाही नागरीकांना त्रास होतो याची दखल घेतली जात नाही.

श्री.विकास एडके : त्या वार्डाचे स.श्री. फेरोज खान यांनी हे गोठे 5 दिवसात हटविले नाही तर आत्मदहन करणार असे निवेदन दिले.कार्यवाही करणार की नाही.

मा.सभापती : शहरात ब-याच भागात म्हशीचे व गायीचे गोठे आहे. त्या लोकांचे ते उपजिविकेचे साधन असते. जे मालक आहे त्यांनी तेथे साफसफाई ठेवतील यासाठी त्यांना तसे प्रशासनाच्या माध्यमातून ताकीद दयावी तसेच शहरातील गोठे शिप्ट करण्यासाठी चिकलठाणा येथे जागा निश्चित केली आहे तेथे इतर सर्व सोयी सुविधा होणे आवश्यक आहे बजेट कमी पडते. त्यासाठी सेन्ट्रल गव्हरमेंन्ट पैसे देणार आहे कालातंराने शहरातील गोठे त्या जागेवर शिप्ट होतील.

श्री.कैलास गायकवाड : एन-6 येथील शाळेच्या इमारत भाडेने देणेसाठी निविदा काढली 6-7 महिण्याचा कालावधी गेला तो प्रस्ताव स्थायी समितीसमोर का आलेला नाही यात मनपाचे 9-10 लक्षचे नुकसान होत आहे.वेळीच कार्यवाही का होत नाही.

अति.आयुक्त : शाळेची इमारत भाडेने देणे बाबत विचार चालू होता टेंडर केले हे प्रकरण मा.आयुक्ता समोर गेले असता मा.आयुक्तांनी अशा इमारती महापालिकेच्या शाळेच्या वापरासाठी ठेवणे योग्य तसेच मनपाच्या शाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करावा.अशा इमारती दुस-या शाळेला देऊ नये.ती निविदा प्रक्रिया तुर्त थांबविली आहे.

श्री.कैलास गायकवाड : इमारत भाडेने दयायची नव्हती तर निविदा का काढली यात कुणाची चुक आहे.मा.सभापती यांचेकडे याचा अहवाल देण्यात यावा.

श्री.विकास एडके : सीटीएस नंबर 7661 मंजुरपूरा याला टीडीआर दिला का ?

प्र.सहा.संचालक(न.र) : टीडीआर दिलेला नाही.

श्री.विकास एडके : 1997 ला स्थायी समितीने प्रस्ताव पास करून 7661,7663 या सीटीएस नंबरला कॉम्पॅजेशन करून 8.25लक्ष दिले आहे पुन्हा टीडीआर कसा देत आहोत.दिला असेल तर संबधीत अधिकारी यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करावा.

अति.आयुक्त : जाहीर प्रगटन दिले होते ऑब्जेक्शन आले त्यामूळे रद्य केले आहे.

मा.सभापती : यात चुक कुणाची आहे संचिका तपासून घ्यावी कार्यवाही करावी.

श्री.रावसाहेब आमले : मिटमीटा गट नं 139 ला मुळ मालकांना टीडीआर दिला ती जागा मनपाने ताब्यात घेतली परंतु त्याच जागेवरच मनपाचे अधिकारी व काही प्लॉट धारकांनी संगनमत करून लेआऊट मंजूर करून घेतला व तेथे 20x30 चे प्लॉट करून बांधकाम परवानगी सुध्दा दिली.

सहा.संचालक(श्री.देशमुख): प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली जाईल चुकीचे असेल तर कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती : टीडीआर संदर्भात जो प्रश्न उपस्थित केला त्याची माहिती घेऊन पुढील सभेत सादर करावी. तसेच एन-6 येथील शाळा भाडेने देणे विषयीचा प्रश्न उपस्थित केला महापालिकेच्या अनेक शाळा आहे काही चांगल्या शाळा तेथे विदयार्थी संख्या आहे काही शाळेच्या इमारती भाडेने दिल्या एन-6 च्या शाळेच्या इमारत भाडेने देणे बाबत टेंडर केले. वेळीच प्रोसेस केली असती तर उत्पन्न बुडाले नसते ज्यांचे टेंडर आले ते सुध्दा शाळा चालविणार असे समजते गरीब विदयार्थी शाळेत येतील. त्यांचे शिक्षण होईल मनपाचे उत्पन्नही येईल या विषयी मा.आयुक्ताशी चर्चा करून योग्य निर्णय घेण्यास हरकत नसावी.

या बरोबर आजची सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद